# सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल
# पोलीस शिपाई भरती
# सन २०२२ - २०२३

## - उमेदवारांकरीता सुचना -

- सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ मधील पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा दिनांक १८/०७/२०२४ रोजी खालील ठिकाणी व वेळी आयोजित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | चेस्ट क्रमांक | परीक्षा केंद्राचे ठिकाण | बैठक व्यवस्था | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | ०००६ ते १५५२ | जिल्हा क्रिडा संकुल बहुउद्देशीय हॉल, सिंधुदुर्गनगरी, ओरोस ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | जिल्हा क्रिडा संकुल हॉल | सकाळी १०.०० वा. |
| २. | १५५४ ते २२७२ | शरद कृषि भवन, पोस्ट ऑफीस समोर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | शरद कृषि भवन **( हॉल )** | |
| ३. | २२७३ ते २७८० | शरद कृषि भवन, पोस्ट ऑफीस समोर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | शरद कृषि भवन **( टेरेस )** | |
| ४. | ३००१ ते ३६२९ | शरद कृषि भवन, पोस्ट ऑफीस समोर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | शरद कृषि भवन ( **पार्कींग** ) | |
| ५. | ४००५ ते ४८११ | होमगार्ड कार्यालय, सिडको भवन समोर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | **होमगार्ड कार्यालय** | दुपारी १५.०० वा. |

- सर्व उमेदवारांनी लेखी चाचणीकरीता अदा केलेल्या प्रवेशपत्रात नमूद केलेल्या दिनांकास परीक्षा केंद्रावर ०८.०० ते ०९.३० वा वेळेत हजर रहावे.
- मुख्य प्रवेशद्वार ०९.३० वा बंद केले जाईल. त्यानंतर कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.
- प्रवेश पत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. परीक्षा केंद्रावर आलेल्या उमेदवारांनी पर्यवेक्षकांच्या समोर हजेरीपटावर फोटो लावून स्वाक्षरी करावी.
- उमेदवारांने स्वत:ची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेले आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, पासपोर्ट, महाविदयालयीन ओळखपत्र, वाहन परवाना, यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र व ऑनलाईन प्रवेशपत्राची प्रत ( हॉल तिकीट ) व ०२ फोटो सोबत आणावे, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.
- उमेदवाराना सदर लेखी परिक्षेसाठी या कार्यालयाकडून काळे पेन व पॅड पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी सोबत येताना इतर अनावश्यक वस्तु आणु नये, आणल्यास सदरच्या वस्तु परिक्षा केंद्राच्या बाहेर ठेवण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.
- उमेदवारास परीक्षा वर्गावर मोबाईल, घडयाल, ब्लु-टुथ, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, कॅल्क्युलेटर, नोट पॅड, नोट बुक, तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, प्रतिबंधक वस्तु स्वत: जवळ बाळगणेस पुर्णत: मनाई आहे. अशा वस्तु आढळल्यास उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्याबरोबर गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

- एखादा उमेदवार लेखी परीक्षेस गैरहजर राहिल्यास, तर त्याला पुन्हा लेखी परीक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरिक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.
- उमेदवारांने भरती प्रक्रियेमध्ये उध्दट गैर वर्तन/ अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याचा कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतून बाद करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल.
- उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट/ दलाल, अधिकारी/ कर्मचारी यांच्या भुलथापांना/ अमिषाला बळी पडु नये. उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

ठिकाण :- सिंधुदुर्ग<br>
दिनांक :- १७/०७/२०२४

**( सौरभ कुमार अग्रवाल )**<br>
**अध्यक्ष**<br>
**पोलीस भरती निवड मंडळ, तथा**<br>
**पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग.**